फौ.कि.अ. क्र. ६२/२०२६
कैलास कडुबा साळवे वि. शासन
पोलिस स्टेशन, चिखली
गुन्हा रजिस्टर क्र. १३०/२०२६
CNRNO.MHBU130005832026

भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३ प्रमाणे दाखल झालेल्या निशाणी क्र. ०१ वरील आदेश

अर्जदार कैलास कडुबा साळवे, राहणार शेलुद, तालुका चिखली जिल्हा बुलडाणा यांनी पोलिस स्टेशन, चिखली यांनी गुन्हा क्र. १३०/२०२६ मध्ये जप्त केलेले वाहन हिरो होंडा मोटर्स कंपनी ची डिलक्स मोटरसायकल नोंदणी क्र. MH28 AW 2521 ज्याचा चेसीस नं. MBLHAR233H9D38501 आणि इंजीन नं. HA11ENH9D19764 ही सुपुर्तनाम्यावर मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

२. अर्जदार याने वरील वाहन त्याच्या मालकीचे असल्याचे म्हटले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, पोलिसांनी सदर वाहन गुन्हा क्र. १३०/२०२६ यामध्ये जप्त केले आहे. सदर वाहन पोलिसांनी जप्त केले असून ते पोलिस स्टेशन येथे बंद अवस्थेत आहे. वाहन बंद स्थितीत राहिल्यामुळे ते खराब होण्याची शक्यता आहे. अर्जदारास वाहनाची गरज आहे. अर्जदाराने वाहन मालकी बाबतची कागदपत्रे दाखल केल्याचे म्हटले आहे. अर्जदाराने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. विद्वान तपासीक अंमलदार यांनी कागदोपत्रांची शाहनिशा करुन अटी व शर्तीवर सदर वाहन अर्जदारास देण्याची हरकत कथन केले आहे. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, जप्त होवून हे पुराव्याकामी आवश्यक आहे. जर वाहन सपुर्दनाम्यावर सोडण्यात आले तर त्यात बदल होवू शकतो व हस्तांतरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जदारा तर्फे विद्वान वकिल व विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. अर्जदाराने

अभिलेखावर स्वत:चे आधार कार्ड, पॅन कार्ड, एफ आय आर, मुकत्यारपत्रची साक्षंकित प्रती अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर दस्ताऐवजावरुन असे दिसून येते की, सदर वाहनाचा अर्जदार कैलास कडुबा साळवे हा मालक आहे. प्रस्तुत प्रकरणात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले नाही. दोषारोपपत्र दाखल होऊन अंतिम न्यायनिर्णय होण्याकरीता बराच कालावधी लागू शकतो. वाहन पोलिस स्टेशन येथे बंद अवस्थेत पडून राहिल्यास वाहनाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत माझ्या मते अर्जदार प्रस्तुत प्रकरणातील वाहनाचा तात्पुरता ताबा मिळण्यास पात्र आहे.

५. वर नमुद केल्याप्रमाणे मी या निष्कर्षाप्रत पोहचले आहे की, अर्जदार प्रस्तुत प्रकरणातील वाहनाचा तात्पुरता ताबा मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे माझ्या मते अर्जदारास स्वतःचा रुपये ५०,०००/- (अक्षरी पण्णास हजार रुपये) चा सुपुर्तनामा बॉन्ड दाखल करण्याबाबतचा आदेश देणे योग्य व न्यायाचे होईल.

६. वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, अर्जदाराचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येतो. |
| २. | जप्त वाहन हिरो होंडा मोटर्स कंपनी ची डिलक्स मोटरसायकल नोंदणी क्र. MH28 AW 2521 ज्याचा चेसीस नं. MBLHAR233H9D38501 आणि इंजीन नं. HA11ENH9D19764 अर्जदार कैलास कडुबा साळवे राहणार शेलुद, तालुका चिखली जिल्हा बुलडाणा यांना रुपये ५०,०००/- (अक्षरी पण्णास हजार रुपये) सुपुर्त नाम्यावर तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येते. अर्जदाराने स्वतः सुपुर्तनामा खालील शर्ती नमुद करुन पोलिस स्टेशन, चिखली येथे सादर करावा. |
| ३. | अर्जदार याने वरील वाहनाबाबत विक्री, गहान अथवा इतर कुठलाही व्यवहार केस प्रलंबित असेपर्यंत करु नये तसेच वाहनाच्या परिस्थितीमध्ये देखिल बदल करु नये व न्यायालयाला आवश्यक वाटल्यास वाहन न्यायालयात हजर करावे. |
| ४. | अर्जदाराने वरील वाहनाचा कोणत्याही गुन्हयात वापर करु नये. |

| | |
|---|---|
| ५. | तपासी अंमलदार पोलिस स्टेशन, चिखली यांनी वरील जप्त वाहन, अर्जदार कैलास कडूबा साळवे राहणार शेलुद, तालुका चिखली जिल्हा बुलडाणा यांच्या ताब्यात सदर वाहनाची विमा उतरविल्याची पावती दाखल केल्यानंतर देण्यात यावे. |
| ६. | तपासी अधिकारी यांनी वाहनाचे दोन फोटो व सविस्तर पंचनामा वाहन देण्यापुर्वी करावा. पंचनामा, फोटो, वाहनाचा विमा उतरविल्याची पावती व सुपूर्तनामा न्यायालयात दाखल करावा. फोटोचा खर्च अर्जदार याने करावा. |
| ७. | तपासी अधिकारी यांनी वरील आदेशाचे तंतोतंत पालन करावे. |

स्वा/-

दि.१८.०३.२०२६

( श्रीमती एम व्ही. पौळ )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(कोर्ट क्र.३ ) चिखली.